CNR No.MHNS130007072017

नियमीत दिवाणी दावा क्रमांक ६१/२०१७
इंदुबाई पगारे वि. वसंत केदारे व इतर

## वादपत्र दुरुस्ती अर्ज निशाणी क्रमांक ४८ खालील आदेश
## (पारीत दिनांक ०१.०१.२०२५)

प्रस्तुतचा अर्ज हा वादीने वादपत्रात दुरुस्ती करण्याकरीता क्रम ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता नुसार सादर केला आहे. अर्जावरील प्रतिवादींचे लेखी म्हणणे वाचले. प्रस्तुत अर्जावर युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत दावा प्रलंबित असतांना दावा मिळकत गट क्र. १५१ पैकी १० आर क्षेत्र अनिता संपत ढोमसे यांना दि. १९/०१/२०२४ रोजी विक्री केली. म्हणुन सदर खरेदीदारास दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणुन सामिल करणे गरजेचे आहे. वादीने कथन केले की, वर नमुद खरेदीखत बेकायदेशीर असल्याने ते वादीवर बंधनकारक नाही आणि ते रद्दबातल करुन मिळावे असा जाहिर ठराव मिळावा अशी विनंती कलमात आणि दाव्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे. याकरीता वादीने न्यायालयीन शुल्क भरलेले आहे.

३. वादीने कथन केले की, प्रतिवादी क्र. १ याचा मुलगा अशोक हा

प्रतिवादी क्र. १ यांना दावा मिळकत विक्री करण्यास आणि वादीचा दावा मिळकतीमधील हिस्सा डावलण्यास प्रोत्साहन देत आहे. म्हणुन वादीने विनंती केली की, प्रतिवादी क्र. १ चा मुलगा अशोक वसंत केदारे यांस प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी म्हणुन सामिल करावे व तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

**४.** प्रतिवादी क्र. ३ याने प्रस्तुत अर्जाकामी त्यांचे लेखी म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी कथन केले की, वादीने मागितलेली प्रस्तावित दुरुस्ती प्रतिवादीस कबुल नाही. प्रस्तावित दुरुस्ती मुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात बदल होणार आहे. म्हणुन अर्ज नामंजुर करावा.

**५.** पक्षकारांचे दरम्यान वास्तविक वाद विषयावर निर्णय करणेकामी जरुरी असेल ती दुरुस्ती वाद कथनात करण्यास परवानगी देणेकामी दुरुस्ती योग्य अयोग्य ठरविण्याचा न्यायालयास व्यापक अधिकार आहे. क्रम ६ नियम १७ प्रमाणे न्यायालय वाद प्रकरणात कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर वाद प्रकरणातील कोणत्याही पक्षकारास वाद कथनात न्याय्य असेल अशा रितीने अटींवर फेरबदल करण्याची किंवा दुरुस्ती करण्याची परवानगी देवू शकतो.

**६.** प्रतिवादी क्र. १ चा मुलगा अशोक वसंत केदारे हा प्रतिवादी क्र. १ यांना दावा मिळकती विक्री करण्यास प्रोत्साहन देतो अथवा तो वादीचा हिस्सा डावलण्याचा प्रयत्न करतो म्हणुन त्यास प्रतिवादी म्हणुन सामिल करता येणार नाही. तशी दाव्यामध्ये दुरुस्ती देखील करता येणार नाही.

**७.** दावा प्रलंबित असतांना प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकत गट क्र.

१५१ पैकी १० आर क्षेत्र अनिता संपत ढोमसे यांना दि.१९/०१/२०२४ रोजी खरेदीखत दस्त नोंदणी क्र. २७९/२०२४ नुसार खरेदी केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. याकामी वादीने सदर खरेदीखत बंधनकारक नसल्याचा आणि ते रद्दबातल आहे असा जाहीर ठरावा मागितला आहे. सबब, दाव्याचे स्वरुप लक्षात घेता सदर दुरुस्तीकामी परवानगी देता येईल. म्हणुन वादीचा अर्ज अंशतः मंजुर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज नि.क्र. ४८ अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. अशोक वसंत केदारे यांना प्रतिवादी म्हणुन सामिल करणेकामी विनंती केलेली प्रस्तावित दुरुस्ती नामंजुर करण्यात येते.

३. वादीने १४ दिवसांच्या कालावधीत प्रस्तावित दुरुस्ती वादपत्रात करुन त्याची प्रत प्रतिवादींना पुरविण्यात यावी.

४. सुधारणेच्या आदेशात नमुद केलेल्या कालमर्यादेत अथवा १४ दिवसांचा कालावधी संपल्यानंतर न्यायालयाने मुदत वाढवुन न दिल्यास वादीला वादपत्रात दुरुस्ती करता येणार नाही.

पिंपळगाव बसवंत
दिनांक – ०१.०१.२०२५

(पी.डी.कोळेकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पिंपळगाव बसवंत